# 5.8 डॉ. राम ताकवले यांचे
# टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन्माननीय
# डी. लिट् पदवी प्रदानोत्तर प्रतिक्रीयात्मक भाषण

पदविदान समारंभाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरनीय श्री. सुशीलकुमारजी शिंदे विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. हिरा अद्यंताया, मा. नाना धर्माधिकारी, विशेष अतिथी डॉ. विजय भाटकर, विद्यापिठाचे अधिकारी मंडळ, सदस्य, प्राध्यापक, पुण्याच्या महापौर सौ. दिप्ती चौधरी उपस्थितीत विद्वतजन, सहयोगी विद्यार्थी, स्नातक, सन्माननीय निमंत्रित आणि बंधू भगिनींनो,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची सन्माननीय डी. लीट. पदवी देऊन आज आपण जो माझा सन्मान केला त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो. महाराष्ट्रातील काही जेष्ठ संशोधक, कलावंत, पंडीत, शक्षण तज्ञ, ज्यामध्ये डॉ. रा. ना. दांडेकर, प्रा. पु. ल. देशपांडे, पं. भीमसेन जोशी आदि श्रेष्ठ व्यक्ति आहेत, त्यामध्ये मला आपण निवडले, योग्य मानले याबद्दल मी धन्यता मानतो. शालेय विद्यार्थी असतांना ५५ वर्षांपूर्वी मी या विद्यापीठाचा संस्कृतच्या परिक्षा देणारा एक विद्यार्थी होतो. आज पुन्हा मी या विद्यापीठाचा विद्यार्थी होत आहे याबद्दल मला आनंद होत आहे.

आपण मला प्रदान केलेली डी. लिट दोन कारणांनी मला महत्वपूर्ण वाटते. एकतर, भारतीय असंतोषाचे जनक आणि भारतीय स्वातंत्र्यांच्या हक्काचे उद् गाते, लोकमान्य टिळकांचे नामाभिदान असलेल्या विद्यापीठाची ही पदवी आहे. दुसरे असे की, महात्मा गांधीच्या नेतृत्वाखालील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने ज्या "राष्ट्रीय शिक्षण" देणा-या संस्था निर्माण केल्या. त्यापैकी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ही एक आहे. या विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षकांनी अध्ययन आणि अध्यापनाच्या कार्याबरोबरच भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. समाज आणि राष्ट्रापुढील प्रश्न सोडवण्यात प्रयत्नशील असणा-या "राष्ट्रीय शिक्षण पद्धतीची" सुरुवात आपण केली. म्हणून मला आपली पदवी महत्वपूर्ण वाटते.

गेल्या ५५ वर्षात भारतापुढे ज्या शैक्षणिक समस्या आहेत, त्यातील सर्वात महत्वाच्या म्हणजे "भारतीय/ राष्ट्रीय शिक्षण पद्धतीची" निर्मिती आणि समाजापुढील विकासाचे प्रश्न सोडवणारे जीवन केंद्री आणि समाज विकास केंद्री शिक्षण पद्धतीचा विकास हे दोन्ही प्रश्न आज अत्यंत महत्वाचे आहेत असे मी मानतो.

लो. टिळकांनी महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे वर्णन 'पदवीधर निर्माण करणारे कारखाने' असा केला होता. ते आजही लागू आहे. औद्योगिक युगातील ही शिक्षण पद्धती आपण इंग्रजांकडून घेतली. शिक्षणतज्ञ तिचे वर्णन 'Factory  Model Of Education' असे करतात.कारखान्यामधील सरकत्या पट्ट्यावरुन वस्तूंची जशी गटाने आणि समूहाने निर्मिती होते तशीच निर्मिती पदवीधरांची महाविद्यालयांतून होते. म्हणूनच आपण एकमेकांना विचारतांना 'तू कोणत्या 'बॅच'चा' आसे विचारतो. औद्योगिक युगाने 'Mass Production' – लोक उत्पादन दिले. त्याच युगातील शिक्षण पद्धतीने 'Mass Production'  - लोक शिक्षण दिले.

औद्योगिक युगाच्या अगोदरच्या शेती – निष्ठ समाजात 'गुरुकुल' शिक्षण पद्धती होती. 'व्यक्तीनिहाय' शिक्षण देणारी, विद्यार्थ्यांच्या जीवनात – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांना त्यांच्या जीवनात आवश्यक ते शिक्षण देणारी ती शिक्षण पद्धती होती. अर्थात त्या पद्धतीत शूद्र, अतीशूद्र आणि स्त्रीया यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता, राजसत्ता, अर्थसत्ता आणि धर्मसत्ता समाजाचे नियंत्रण करीत होती. सरंजामशाही अस्तित्वात होती. कष्ट करणा-यांना आणि सेवा दोणा-यां ना समाजाच्या तळाचे स्थान होते. औद्योगिक क्रांतीचे हे चित्र पालटले. उतरंड मोडली कष्ट करणारे आणि सेवा देणारे औद्योगिक युगात संपत्ती आणि समृद्धी निर्माण करणारे झाले . राजसत्ता आणि धर्मसत्ता जाऊन स्वातंत्रधिष्टीत लोकसत्ता उद्यास आल्या. आधुनिक युगात मानवाने 'समता' आणि 'लोकशाही' ही अद्वितीय मूल्ये निर्माण केले. आणि आज भारतीय समाजाची जडण – घडण, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर होत आहे. एका मोठ्या परिवर्तनाच्या मन्वंतराच्या चक्रातून आपण आज आहोत. शिक्षण पद्धतीनेही ही मूल्यें स्विकारली आहेत आणि सार्वत्रिक शिक्षण, लोकशिक्षण, प्रौढ शिक्षण, सर्वांसाठी शिक्षण इ. शैक्षणिक कार्यक्रम आज आपण राबवित आहोत. व्यक्तिनिहाय वर्गीय शिक्षणापासून सर्वांसाठी लोकशिक्षणा (Mass Education) पर्यंत शिक्षण व्यवस्थेची वाटचाल ही या दोन युगांच्या धारणेची मूलभूत तत्वे आहेत.

औद्योगिक समाजाच्या उत्पादन, वितरण आणि सेवा प्रक्रियांत माणूस हा या यंत्राचा भाग बनला, स्वत्व विसरला. तसेच लोकशिक्षण देणा-या शिक्षण पद्धतीमध्ये, वर्गामध्ये, विद्यार्थ्यांचा चेहरा हरवला. विद्यार्थ्याला त्याचा चेहरा प्रदान करणा-या अनेक Classroom, वर्गबाह्य उपक्रमांची निर्मिती करण्यात आली. परंतु 'वर्ग' – classroom हीच शिक्षण देण्या-घेण्याची प्रमुख व्यवस्था आज शिक्षण पद्धतीत राहिली आहे.

२१ व्या शतकात आज आपण प्रवेश केला आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या द्वारे संपर्क आणि संवाद क्रांती आज घडत आहे. संक्रमणाच्या, परिवर्तनाच्या कालखंडातून आपण जात आहोत. संगणक, इंटरनेट, महाजाल (नेटवर्क) हे परिवलीचे शब्द आणि साधने झाली आहेत. मोबाईल तंत्रज्ञान आणि मोबाईल इंटरनेट वापर व्यापक होऊ लागला आहे. आज भारतात १०० पैकी ३ माणसे मोबाईल वापरत आहे. येत्या ८- १० वर्षात ८० टक्के भारतीय मोबाईलचा वापर करतील असा तज्ञांचा अंदाज आहे.

आजच्या तिस-या पिढीचा मोबाईल फोन त्यावेळी १०-१२ व्या पीढीचा असेल. तुमच्या आमच्या जीवनांत सर्व क्षेत्रांतील व्यवहार आणि संपर्क चा इ. माध्यमांतून होणार आहेत. ते व्यवहार, संवाद, संपर्क महाजालांमध्ये कुठे ना कुठेतरी नोंदले जाणार आहेत. नवे माहितीचे विश्व, माहितीचे अवकाश (Information Word or Information Space) निर्माण होणार आहे. त्या विश्वातील माहीतीतून उपयूक्त ज्ञान शोधून, त्या ज्ञानाचा वापर करुन मूल्यवर्धित सेवा आणि उत्पादन कार्ये करावी लागणार आहेत. यालाच आपण नवे ज्ञानाधिष्ठीत युग म्हणतो.

माहिती तंत्रज्ञानांतील या नव्या युगातील प्रक्रिया ज्ञानाधिष्ठीत राहणार आहेत. शिक्षण हा ज्ञानार्जनाचा एकमेव मार्ग असल्यामुळे या नव्या युगातील शिक्षण पद्धतीला आपले स्वरुप आणि प्रारुप बदलून नवी पद्धती आणि प्रारुपे धारण करावी लागणार आहेत. माहिती संपर्क तंत्रज्ञान वापरुन कोणासही, कोठूनही आणि केव्हांही

शिक्षण घेता येणार आहे. शिक्षकांशी आणि ज्ञान – स्त्रोतांशीं सबंधीत रहाता येणार आहे. या नव्या युगाचे धारणा – तत्वे आहे. लोक – व्यक्तिनिहाय शिक्षण अथवा लोक-व्यक्तिनिहाय (Mass-Personalised) उत्पादन शेतीनिष्ठ आणि औद्योगिक या दोन्ही समाजाचे मीलन येथे होणार आहे.

या नव्या ज्ञानाधिष्ठीत समाजाची शिक्षण पद्धती आणि शिक्षण व्यवस्था कोणती? असा आजचा यक्ष प्रश्न आहे. विचांरांती मला असे वाटते की, लोक-व्यक्तिनिहाय शिक्षण देणारी, आजीवन अध्ययनशील बनवणारी, जगण्याचा शिक्षणाशी आणि विकासाशी सतत संबंध जोडणारी, समाज – विकास केंद्री जीवन पद्धती हीच भावी शिक्षण पद्धती राहील. हीच शिक्षणपद्धती विकसित करण्याचा प्रयत्न टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने प्रारंभीच्या कालखंडात केला होता. ज्ञानाधिष्ठित प्रगतीचे आणि विकासाचे, स्वावलंबी आणि समाजाधिष्ठीत मार्ग निर्माण करण्याचे आणि निवडण्याचे लोकशाही स्वातंत्र्याचे हक्क शिक्षणाद्वार सर्वांना उपलब्ध करुन देण्याचे ध्येय शिक्षण व्यवस्थेचे असले पाहिजे.

ही नव्या युगाची नवी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याच्या कार्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठ अग्रभागी राहो ही शुभेच्छा. आणि या प्रयत्नात मला आपला विद्यार्थी म्हणून सहभागी होण्याची संधी आपण सन्मानीय ‘डी.लिट्.’ ही पदवी देऊन दिली आहे. याबद्दल मन:पूर्वक आभार.

**धन्यवाद !**